स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई.
(अधिष्ठाता यांचे कार्यालय)
SWAMI RAMANAND TEERTH RURAL GOVT. MEDICAL COLLEGE, AMBAJOGAI DIST BEED
PH NO (02446)245792/248963/249362/248438/-DFAX02446/247132 Website www.srtrmca.org emailsrt.acad@rediffmail.com

जा.क्र. वैमअं/किभांवि/दरपत्रके मागणी/ 9473 /२०२१ दिनांकः- 08/१०/२०२१

कार्यालयीन आदेश

विषय :- विद्युत उपकरणे, फर्निचर (लाकडी,लोखंडी व फायबर) व इ. साहित्यांचे दरपत्रक सादर करणे बाबत...
संदर्भ :-१.दि.०५.०५.२०२१ रोजीची खरेदी समितीची बैठक.
२.दि.०४.१०.२०२१ रोजीची मंजुर टिपणी.

उपरोक्त विषयी संदर्भ क्र. १ व २ अन्वये आपणास कळविण्यात येते की, या महाविद्यालयातील विविध विषयांचे विभाग, ग्रंथालय विभाग, प्रशासकीय कार्यालय व वैद्यकीय विद्यार्थी वस्तीगृहांकरीता विद्युत उपकरणे व इ. साहित्यांचे दरपत्रक खालील प्रमाणे अटी व शर्तीनुसार सोबत जोडलेल्या पान क्र.०२ वरील यादीनुसार सादर करण्यात यावे.

तसेच सदर सुचनेनुसार मोहरबंद दरपत्रके मा.अधिष्ठाता,स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई यांच्या नावे सादर करण्यात यावी.तसेच सदरील साहित्यांचे दरपत्रक सादर करण्यासाठी अंतिम दिनांक १४/१०/ २०२१ रोजी दुपारी ०५:०० वा. पर्यंत असून प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक १८/१०/२०२१ रोजी प्रशासकीय कार्यालयात खरेदी समिती समक्ष उघडण्यात येतील.

| अ.क्र. | साहित्यांचे नाव | नग संख्या | प्रत्येकी दर |
|---|---|---|---|
| ... | सोबत अ.क्र.०१ ते अ.क्र.२३ पर्यंतची यादी पान क्र. ०२ वर देण्यात आलेली आहे. | एकुण २३ नग | ... |

अटी व शर्ती :-

१. दरपत्रक धारकाने मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ नुसार दुकानाचे शासनमान्य नोंदणी प्रमाणपत्र किंवा दरपत्रक धारकाकडे सुक्ष्म,लघु व मध्यम उद्यम मंत्रालय भारत सरकार यांच्याकडे नोंदणी केलेले उद्योग आधार प्रमाणपत्र छायांकीत प्रत दरपत्रका सोबत जोडणे बंधनकारक आहे.
२. दरपत्रक धारकाच्या दुकानाचे नाव, संपुर्ण पत्ता, नोंदणी क्रमांक,जिएसटी नंबर व पॅन नंबर असलेल्या दुकानाच्या लेटर पॅडवर सहि व शिक्का असलेली दरपत्रके सदर साहित्याच्या अ.क्र. यादीनुसार सादर करण्यात यावी. तसेच ज्या साहित्यांचे दर उपलब्ध होऊ शकत नाहित त्या साहित्यांच्या दराच्या ठिकाणी एन.ए. (NA) असे नमुद करावे.
३. दरपत्रका सोबत शासनमान्य जिएसटी प्रमाणपत्र, फर्मच्या नावाचे किंवा प्रोप्रायटरच्या नावाचे पॅन कार्डची छायांकीत प्रत,सन २०१९-२० व सन २०२०-२१ या वर्षाचे आयटीआर प्रमाणपत्र जोडण्यात यावे तसेच एकल दरपत्रक धारक असल्याचे स्वतः स्वाक्षरीचे प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. (सदर प्रमाणपत्र नमुना पान क्र. ०३ वर देण्यात आलेला आहे.)
४. दरपत्रकातील साहित्यांच्या दरात जीएसटी कर समाविष्ठ करण्यात आला आहे किंवा अतिरिक्त आकारला जाणार आहे याबाबत नमुद करणे बंधनकारक आहे. तसेच दरपत्रकातील दर बाजार भावापेक्षा जास्त दराचे सादर करण्यात येऊ नये.तसेच सर्व साहित्य स्वतः स्वखर्चाने दहा दिवसांच्या आत पुरवठा करणे बंधनकारक राहिल. तसेच वाहतुक खर्च किंवा इतर कोणताही जादा खर्च देण्यात येणार नाही.
५. मागविण्यात आलेल्या साहित्यांचे दरपत्रक प्रमाणित झाल्याच्या दिनांका पासुन सहा (०६) महिण्यांपर्यंत वैध राहतील.
६. प्रशासकीय कारणास्तव देयके अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब शुल्क किंवा व्याज देण्यात येणार नाही.
७. पुरवठा करण्यात येणारे साहित्य नामांकीत कंपनीचे गॅरंटी व वारंटीसह चांगल्या प्रतीचे असावे. हलके किंवा निकृष्ठ दर्जाचे असल्यास पुरवठा आदेश रद्द करण्यात येतील तसेच रद्द करण्यात आलेल्या आदेशाचे कोणतेही देयक अदा केले जाणार नाही व याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहिल.
८. तसेच अपुर्ण माहितीसह व प्रमाणपत्रा शिवाय सादर केलेली संबंधीतांची दरपत्रके विना स्पष्टीकरन नाकारण्यात येतील व याबाबत कसल्याही प्रकारे लेखी स्वरुपात कळविण्यात येणार नाही. तसेच प्रशासकीय कारणास्तव किंवा निधी अभावी काही अडचण निर्माण झाल्यास साहित्य खरेदीबाबत सदरच्या दरपत्रकाची संपुर्ण प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांना राहील.
९. उपरोक्त प्रमाणे अटी व शर्ती मान्य असल्यासच सदरचे दरपत्रक सादर करावे.

अधिष्ठाता
स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय
वैद्यकिय महाविद्यालय,अंबाजोगाई.

प्रतः- १.प्रभारी एच.एम.आय.एस. यांना आदेशित करण्यात येते की,सदरचे दरपत्रके मागणी आदेश व साहित्यांची यादी संस्थेच्या वेबसाईटवर प्रदर्शित करावी तसेच प्रदर्शित केलेल्याबाबत छायांकीत प्रत किरकोळ भांडार विभागास देण्यात यावी.
२.नोटीस बोर्ड महाविद्यालय विभाग,स्वाा.रा.ती.ग्रा.शा.वै.म. अंबाजोगाई.

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई या संस्थेकरीता लागणाऱ्या खालील प्रमाणे नमुद विद्युत उपकरणे व इ. साहित्यांचे दरपत्रक सादर करण्यात यावे.

| Sr.no. | Name of the Item | Qunt. | Rate |
|---|---|---|---|
| ०१ | वाटर प्युरीफायर (आर.ओ. + यु.व्हि. सिस्टीम) १००० लिटर (इंडस्ट्रीअल प्लांट) टॉप क्वॉलिटी | ०१ नग | ... |
| ०२ | वाटर प्युरीफायर (आर.ओ. + यु.व्हि. सिस्टीम) ५०० लिटर (इंडस्ट्रीअल प्लांट) टॉप क्वॉलिटी | ०१ नग | ... |
| ०३ | वाटर कुलर (२५०बाय २५० कॅपेसीटी) टॉप क्वॉलिटी | ०१ नग | ... |
| ०४ | वाटर कुलर (१५०बाय १५० कॅपेसीटी ) टॉप क्वॉलिटी | ०१ नग | ... |
| ०५ | वॉटर प्युरी फायर (आर.ओ. सिस्टीम) मोठे ५० लिटर | ०१ नग | ... |
| ०६ | वॉटर प्युरी फायर (यु.व्हि. सिस्टीम) मोठे ५० लिटर | ०१ नग | ... |
| ०७ | गोदरेज रेफ्रिजरेटर (२९२ लीटर) | ०१ नग | ... |
| ०८ | डेझर कुलर (५० लिटर) टॉप क्वॉलिटी | ०१ नग | ... |
| ०९ | प्लास्टीक खुर्ची कुशन कव्हरसह (निलकमल) टॉप क्वॉलिटी | ०१ नग | ... |
| १० | प्लास्टीक खुर्ची (निलकमल) टॉप क्वॉलिटी | ०१ नग | ... |
| ११ | ऑफिस कपाट (लोखंडी) (०३ बाय ०६ फुट) टॉप क्वॉलिटी | ०१ नग | ... |
| १२ | ऑफिस टेबल (लोखंडी विथ सनमायका टॉप) डिलक्स क्वॉलिटी (३ बाय ५ फुट) | ०१ नग | ... |
| १३ | ऑफिस टेबल (लाकडी विथ सनमायका टॉप) डिलक्स क्वॉलिटी (३ बाय ५ फुट) | ०१ नग | ... |
| १४ | हॉस्टेल कॉट (पलंग) (लोखंडी) (०२.५ बाय ०६.५ फुट) | ०१ नग | ... |
| १५ | पाण्याची टाकी प्लास्टीक ५००० लिटर (प्लास्टो / पारस कंपनी) | ०१ नग | ... |
| १६ | पाण्याची टाकी प्लास्टीक २००० लिटर (प्लास्टो / पारस कंपनी) | ०१ नग | ... |
| १७ | पाण्याची टाकी प्लास्टीक १००० लिटर (प्लास्टो / पारस कंपनी) | ०१ नग | ... |
| १८ | पाण्याची टाकी प्लास्टीक ५०० लिटर (प्लास्टो / पारस कंपनी) | ०१ नग | ... |
| १९ | सोफा सेट लाकडी (कुशन कव्हरसह) टॉप क्वॉलिटी | ०१ नग | ... |
| २० | सोफा सेट सागवान (कुशन कव्हरसह) टॉप क्वॉलिटी | ०१ नग | ... |
| २१ | टी-पॉय विथ ग्लास टॉप (लोखंडी) (१.५ बाय २ फुट) | ०१ नग | ... |
| २२ | टी-पॉय विथ ग्लास टॉप (लाकडी) (१.५ बाय २ फुट) | ०१ नग | ... |
| २३ | टी-पॉय विथ ग्लास टॉप (सागवान) (१.५ बाय २ फुट) | ०१ नग | ... |

नोट :- उपरोक्त प्रमाणे नमुद सर्व साहित्य नामांकित कंपनीचे तसेच गॅरंटी व वारंटीसह चांगल्या प्रतीचे तसेच बाजारभावा प्रमाणे रास्त असणे आवश्यक आहे.तसेच सदर दरपत्रका सोबत मागणी करण्यात आलेले आपल्या फर्मचे सर्व प्रमाणपत्र जोडण्यात यावे अन्यथा दरपत्रके रद्द करण्यात येतील.

अ.क्र. 01 ते 06 व 15 ते 18 प्रमाणे नमुद साहित्य कार्यान्वीत करुन देणे बंधनकारक राहिल.

अधिष्ठाता
स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म. अंबाजोगाई

# <u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, आपल्या कार्यालयाच्या दरपत्रक मागणी आदेशानुसार मागविण्यात आलेल्या साहित्यांच्या दरपत्रकात माझे स्वतःचे एकच दरपत्रक असुन आपणास प्राप्त झालेल्या दरपत्रकात माझे दुसरे दरपत्रक सादर करण्यात आलेले नाही. तसेच याबाबत पुढील काळात आपल्या कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास माझ्यावर होणाऱ्या दंडात्मक कार्यवाहीस मी स्वतः जबाबदार राहील. करीता सदर प्रमाणपत्र सादर करण्यात येत आहे.

दरपत्रक धारकाची स्वाक्षरी व शिक्का

दिनांक :-

दरपत्रक धारकाचे नाव :-

ठिकाण :-

संपुर्ण पत्ता :-

मो.नं. :-